## आदेश नियमीत दिवाणी दावा क्र. २६/२०१८ मधील निशाणी क्र. ७१ करीता

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे दाखल करुन पोलीस खाते मेढा यांचेकडुन दिलेल्या बंदोबस्ताबाबतची सर्व कागदपत्रे, तसेच दि. ०५.०९.२०२४ रोजी कारवाई वेळी हजर असलेल्या सर्व कर्मचारी, तसेच फोटोग्राफी/शुटींग इत्यादी सर्व माहिती तसेच ग्रामपंचायत बामणोली यांचेकडे केलेला अर्ज व त्याअनुषंगाने दि. ०५.०९.२०२४ रोजी केलेल्या कारवाई संदर्भातील कागदपत्रे सदर दाव्याच्या चौकशी कामी मागवणेत यावेत अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी निशाणी क्र. ४२ कडे अर्ज देवुन दावा कलम १ मधील मिळकतीत घर बांधणीस पोलीस संरक्षण मिळणेबाबत अर्ज दिला होता. तो मंजुर झाला आहे. परंतु, वादी यांच्या निशाणी क्र. ४२ वरील आदेशास निशाणी क्र. ५८ व ६० प्रमाणे वादीचे हुकुमास पुढील तारखेपर्यत स्थगिती दिलेली होती. असे असताना वादीने निशाणी क्र. ४२ चे आदेशाची अंमलबजावणी कायदयातील तरतुदींचा विचार न करता न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी परस्पर केली आहे.

०३. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, वादी यांनी निशाणी क्र. ४२ कडील आदेशाच्या आधारे परस्पर पोलीसांकडे बंदोबस्त मागणी करुन त्याप्रमाणे दि. ०५.०१.२०२४ रोजी बंदोबस्त घेवुन प्रतिवादीचे मालकीचे जागेचा ताबा घेतलेला आहे. याचे फोटोग्राफी व व्हीडीओ शुटींग पोलीसांनी केलेले आहे. तसेच वादीने ग्रामपंचायत बामणोली यांचेकडेही वेगळा अर्ज देवुन त्याचे आधारे कब्जा घेतेवेळी त्यांना हजर राहण्यास कळवलेले आहे. सदर अर्जाची प्रत तसेच फोटो याकामी दाखल करत आहे. वादी यांनी न्यायालयाचे आदेशाचा गैरफायदा घेतला आहे. तसेच संबधीत खात्यांनी मदत केलेली आहे. बंदोबस्ताचे वेळी जादा पोलीस हजर होते. सदर पोलीसांनी वादीस जागेचा ताबा प्रतिवादीकडून काढून घेवुन दिलेला आहे. तसेच दिवाणी न्यायालयाचा आदेश आहे म्हणुन याकामी ग्रामपंचयतीने जागेचा ताबा देताना मदत केलेली आहे. सदर बाबी हया कायदयाचे उल्लंघन करणा–या आहेत. सबब, प्रतिवादी यांनी वर नमुद केलेली कागदपत्रे मागविण्याबाबत आदेश पारीत होण्याची विनंती केली.

०४. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी क्र. ७३ कडे म्हणणे देवुन अर्ज मंजुर करणेस तीव्र आक्षेप घेतला आहे. वादीच्या मते प्रतिवादीस अर्जात नमुद कलम १५१ प्रमाणे अर्ज देता येत नाही. कारण कायदयात तरतुद नसेल तर सदर कलमाचा वापर करता येतो. प्रतिवादीस स्वतः संबधीत कार्यालयात अर्ज दिलेस त्याच्या नकला प्राप्त होवु शकतात. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालण्यास पात्र नाही. सबब, वादी यांनी अर्ज नामंजुर करणेची विनंती केली.

०५. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

०६. वादीने प्रस्तुतचा दावा हा ते दावा मिळकत ही त्यांच्या कब्जे वहिवाटीची आहे, असा जाहीर ठराव व निरंतर ताकीद मिळणेसाठी केला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जात मागणी केलेल्या कागदपत्रांच्या वर्णनावरुन सदरची कागदपत्रे ही 'सार्वजनिक दस्तऐवज (public documents) असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, प्रतिवादी यांना संबधीत कार्यालयाड्डुन सदर कागदपत्रांच्या सही शिक्क्याच्या नकला अगर माहितीच्या अधिकाराखाली सदरची कागदपत्रे सहज मिळु शकतात. तसेच, प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे जरी सदरची कागदपत्रे दाव्याच्या कामी आवश्यक पुरावा असला तरी दाव्यात वादीचा पुरावा अजुन सुरु झालेला नाही. त्यामुळे सद्य परिस्थितीत मागणी केलेली कागदपत्रांची आता गरज असल्याचे दिसुन येत नाही व सदरची कागदपत्रे ही ''सार्वजनिक दस्तऐवज' (public documents) स्वरुपाची असल्याने प्रतिवादी त्या दस्तऐवजांची सत्यप्रत सदर प्रकरणात दाखल करु शकतात. प्रतिवादींनी निशाणी क्र. ९४ वर ग्रामपंचायत बामणोली यांच्याकड्डुन दि. ०१.१०.२०२४ रोजीची लेखी पत्र अभिलेखावर दाखल केलेले आहेच. पोलीस विभागाने माहितीच्या अधिकारात संबधीत कागदपत्रे दिली नसलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा परिस्थीतीत, प्रस्तुतचा अर्ज या टप्प्यावर मंजुर करणे योग्य व कायदेशीर होणार नाही. या उपरोक्त पुरावा नोंदवताना सदर कागदपत्राची गरज भासल्यास त्या टप्प्यावर तसा अर्ज करता येईल. सद्यस्थितीत सदर अर्ज हा मंजुर होण्यास पात्र नाही. करिता मी खालील आदेश पारीत करत आहे.

<u>**आदेश**</u>

०१. अर्ज निशाणी क्र. ७१ नामंजुर करणेत येतो.

०२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2026.01.02 18:04:15 +0530

स्थळ : मेढा (डॉ. विक्रम अं. आव्हाड)

तारीख : ०२.०१.२०२६ **दिवाणी न्यायालय क. स्तर, मेढा**